## भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(सायकांळ)

जा.क्र. ५००/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक:–१२/०८/२०१६.

**१) अश्लिल शब्दात शिवीगाळ करुन जिवाने मारण्याची धमकी दिली . :–**

दिनांक ११/०८/२०१६ रोजी १३.३० वा. दर. यातील आरोपी हा ग्रा. पं. कार्यालयात जावुन तेथील चपराथी यांचे सोबत भांडण करुन मारपीट व शिविगाळ केली असता फिर्यादी ही त्यास चपराश्याला कशाला मारपीट केली असे हटकले असता भांडण करुन फिर्यादीला अश्लिल शब्दात शिविगाळ करुन जिवाने मारण्याची धमकी दिल्याने असे फिर्यादी सौ. मंगला रामभाऊ इळपाते वय ३६ वर्ष, रा. दिघोरी यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन कारधा येथे कलम २९४,५०६ भादंवि अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सफौ. गौर पो.स्टे. कारधा हे करीत आहेत.

**२) दारुच्या नशेत वाहन चालवितांना मिळुन आल्याने गुन्हा नोंद . :–**

दिनांक ११/०८/२०१६ रोजी १९.०० वा. दर. यातील आरोपी चालकाने आपल्या ताब्यातील ट्रक क्र. एमएच ४० वाय ०१३४ च्या चालकाने दारु पिवुन दारुच्या नशेत चालवितांना मिळुन आल्याने त्याचे ब्रिथ अल्कोहोल ॲनालायझर मशीनव्दारे चेक केले असता अल्कोहोलचे प्रमाण मिळुन आल्याने पोलीस स्टेशन कारधा येथे कलम १८५(१) मोवाका अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. मुटकुरे पो.स्टे. कारधा हे करीत आहेत.

**३) अतिमद्य प्राशन केल्याने इसमाचा उपचारा दरम्यान मृत्यु . :–**

दिनांक ११/०८/२०१६ रोजी १०.३० वा. दर. मृतक शिशुपाल भगवान ऊइके वय २३ वर्ष, रा. नांदीखेडा हा अती दारु सेवन करण्याच्या सवईचा असुन अती दारु सेवन केल्याने त्याची प्रकृती बिघडल्याने ग्रा.रु. पवनी येथे भरती केले असता उपचारा दरम्यान मरण पावल्याने फिर्यादी श्रीमती ताराबाई भगवान ऊईके वय ५० वर्ष, रा. नांदीखेडा यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन पवनी येथे कलम १७४ जाफौ. अन्वये मर्ग दाखल करण्यात आला. पुढील चौकशी पोहवा. मस्के पो.स्टे. पवनी हे करीत आहेत.

( श्री.एस. टी. घुसर )
प्रभारी. पोलीस उपअधिक्षक(गृह)
भंडारा.
दुरध्वनी.क्र. ८८०५६१९१९१

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती

प्रत, संगणक कक्ष, भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.